दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | शनिवार दि.२७ डिसेंबर २०२५ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक १२३ | पाने ४ | किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi | Saturday 27 December 2025 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 123 | Pages 4 | Rate 4 Rs

## प्रकाश महाजन अखेर शिंदे गटात

**मुंबई**–मनसेला सोडचिठ्ठी दिलेल्या प्रकाश महाजन यांनी आज अखेर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेत प्रवेश केला आहे. एकनाथ शिंदे यांनी यांच्या उपस्थितीत त्यांनी पक्षप्रवेश केला. यावेळी शिंदेंनी ठाकरे बंधूंच्या युतीवरही निशाणा साधला. सध्या केवळ खुर्ची, स्वार्थ, सत्ता व स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी होत आहेत. काही नवीन लोकं युती करत आहेत. त्यांनी पूर्वीच त्यांचा अनुभव घेतला आहे. पण आता ते पुन्हा त्याचा अनुभव घेण्यासाठी एकत्र आलेत, असे ते राज ठाकरे यांचे नाव न घेता त्यांना टोला हाणताना म्हणालेत.प्रकाश महाजन यांनी काही दिवसांपूर्वी मनसेला सोडचिठ्ठी दिली होती. तेव्हापासून ते कोणत्या पक्षात जाणार? असा प्रश्न विचारला जात होता. आज अखेर त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत सत्ताधारी शिवसेनेत प्रवेश करून या चर्चेला पूर्णविराम दिला. यावेळी बोलताना एकनाथ शिंदे यांनी त्यांचे तोंडभरून कौतुक केले. ते म्हणाले, मी प्रकाश महाजन यांचे मनापासून शिवसेनेत स्वागत करतो. त्यांनी शिवसेना व माझ्यावर विश्वास ठेवून संघटनेत काम करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यानुसार त्यांचा आज शिवसेनेत पक्षप्रवेश झाला.

# १६ जानेवारीला आपण अटलजींना खरी आदरांजली द्यायची आहे-मुख्यमंत्री फडणवीस

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

२५ डिसेंबर संपूर्ण देशभरात श्रद्धेय भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जात आहे. या निमित्त भाजपा मुंबईच्या वतीने संपूर्ण मुंबई शहरात वेगवेगळ्या ठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याचाच एक भाग म्हणून 'चित्र-चरित्र प्रदर्शनी'चे उद्घाटन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीसजी यांच्या शुभहस्ते वसंतस्मृती कार्यालय, दादर येथे करण्यात आले. या कार्यक्रमाची सुरुवात ढोलताशांच्या गजरात मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या स्वागताने झाली. त्यानंतर भाजपा महिला मोर्चाकडून औक्षण करण्यात आले. मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस आणि भाजपा मुंबई अध्यक्ष आणि आमदार मान. श्री अमित साटम यांनी भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालत आदरांजली वाहिल्यानंतर मुख्य कार्यक्रमाला सुरुवात झाली. भाजपा मुंबई अध्यक्ष आणि आमदार मान. श्री अमित साटम यांच्या प्रास्ताविक भाषणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी बोलताना ते म्हणाले, मागच्या ११ वर्षांत देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईलाच नाही तर संपूर्ण महाराष्ट्राला 'सुशासन' नेमकं काय असतं हे दाखवून दिलं आहे. मुंबईतील मेट्रो, अटल सेतू, कोस्टल रोड आणि बीबीडी चाळीतील माणसाला ५६० चौरसफुटांचं घर ही सर्व कामे कोणी केली हे माहित आहे. देवेंद्र फडणवीस आणि भाजपाने मागील ११ वर्षांत ज्या प्रमाणे काम केलं त्याने मुंबईकर प्रभावीत झालेले आहेत. त्यामुळे आगामी काळात मुंबई महापालिकेवर महायुतीचा भगवा झेंडा फडकताना दिसेल.



श्री अमित साटम यांच्या भाषणानंतर श्री. देवेंद्र फडणवीस यांचे भाषण झाले. यावेळी त्यांनी भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या कार्यपद्धती इतिहास आणि देशासाठी त्यांनी घेतलेल्या ऐतिहासिक निर्णयांबद्दल उत्स्फुर्तपणे सांगितले. ते म्हणाले, भारतमातेच्या या सुपुत्राने जवळपास ५ दशकांपर्यंत या देशाला दिशा देण्याचा यशस्वी प्रयत्न केला आणि आपले पंतप्रधान मान. नरेंद्र मोदी यांनी जो नवभारत तयार केला. त्या नवभारताचा पाया रचणारे श्रद्धेय भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी होते. या भारतीय जनता पार्टीला त्यांनी विपरीत काळामध्ये दिशा दिली आणि हिंदुत्त्वाच्या संकल्पनेच्या व्यापक विचारांशी त्यांनी कधीच तडजोड केली नाही. पहिल्यांदा परराष्ट्रमंत्री झाल्यानंतर भारताचं परराष्ट्र धोरण अटलजींनी परिभाषित केलं तेच धोरण आजही महत्त्वाचं मानलं जातं.ते पुढे म्हणाले, देशामध्ये पंतप्रधान म्हणून अटलजींनी केलेलं कार्य हे अविस्मरणीय आहे. ते नेहमी म्हणायाचे 'रस्ते हे देशाला एकात्मतेकडे नेतात' आणि त्यांच्याच संकल्पनेतून देशाला वर्ल्डक्लास हायवे पाहायला मिळाले. त्यांनी पहिल्यांदा प्रधानमंत्री ग्रामसडक योजना देशात सुरु केली. ज्यामुळे शहरे गावांशी जोडली गेली. भारत देश अणुसंपन्न करण्याचं काम त्यांनी केलं. मोठ्या राष्ट्रांकडून दबाव येत असताना अटलजी त्यांच्या निर्णायावर ठाम राहिले आणि आज भारत एक बलवान देश म्हणून उभा आहे. एवढंच नाही तर अटलजींच्या काळात देशाची अर्थव्यवस्था १० टक्क्यांपर्यंत वाढली. अणुस्फोटानंतर जगाने बहिष्कृत केलेल्या आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेला ठामपणे उभं करणारे अटलजी होते.श्री. देवेंद्र फडणवीस म्हणाले, अटलजींनी ज्या प्रकारे भाजपा मुंबईमध्ये सुरुवात करून दिली होती त्याचप्रमाणे, पुन्हा एका मुंबईच्या महानगरपालिकेमध्ये महायुतीची सत्ता आणून अटलजींचे कार्य पुढे न्यायचे आहे. आपली लढाई ही मुंबईकरांची लढाई आहे. पारदर्शी आणि प्रामाणिकतेतून मुंबईची महानगरपालिका चालली पाहिजे हा संकल्प घेऊन आम्ही या निवडणूकीत उतरलो आहोत. आज तर आपण अटलजींना आदरांजली देतोच आहोत पण १६ जानेवारीला आपण अटलजींना खरी आदरांजली द्यायची आहे. याशिवाय मुंबई सरचिटणीस राजेश शिरवडकर यांनी, जेव्हा मुंबईमध्ये आपल्या दोन खासदारांना विरोधीपक्षातले नेते हिणवत होते तेव्हा अटलजींनी संसदेत ठणकावून सांगितलेलं, आज तुम्ही आमच्यावर हसत आहात पण येणाऱ्या काळात संपूर्ण देश तुमच्यावर हसेल आणि आज काँग्रेसची जी अवस्था झालेली आहे ती सर्वजण पाहतच आहोत. येत्या निवडणुकीत मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस आणि श्री. अमीत साटम यांच्या नेतृत्वाखाली आपल्याला महापालिकेवर महायुतीचा भगवा फडकवायचा आहे. अशा शब्दांत आपले विचार मांडले. दरम्यान या कार्यक्रमाच्या निमित्ताने वसंतस्मृती कार्यालयात अटलजींची पोर्ट्रेट रांगोळी काढण्यात आली होती. तसेच अटलजीच्या लाईव्ह स्कल्प्चरचेही आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमालाही मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांनी भेट दिली. या प्रसंगी व्यासपीठावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रीय सहसंगठन महामंत्री शिवप्रकाशजी, भाजपा मुंबई अध्यक्ष आ. अमीत साटम, कॅबिनेट मंत्री मंगलप्रभात लोढा, आ. कालिदास कोळंबकर, आ. विद्या ठाकूर, राजहंस सिंह, सरचिटणीस आचार्य पवन त्रिपाठी, राजेश शिरवडकर, श्वेता परुळकर आणि भाजपाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



# नियोजित द्रुतगती मार्गात बदल करू नये खा रजनीताई पाटील

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

नियोजित लातुर – कल्याण (जनकल्याण द्रुतगती मार्ग) या मार्गामाध्ये बदल न करता लातुर – अंबाजोगाई –केज – बीड–जामखेड – अहिल्यानगर – कल्याण हाच मार्ग कायम ठेवण्याची मागणी खा. रजनीताई पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या हिवाळी अधिवेशना मध्ये आपण लातुर ते मुंबई हे अंतर सध्याच्या १० ते १२ तासांवरुन ४ ते ५ तासांत पुर्ण करण्याच्या उद्देशाने लातुर कल्याण (जनकल्याण द्रुतगती मार्ग) हा महत्वाकांक्षी द्रुतगती प्रकल्प जाहीर केला आहे. उपलब्ध माध्यमांव्दारे मिळालेल्या माहितीनुसार हा मार्ग लातुर कळंब – पारा – ईट – खर्डा – जामखेड – अहिल्यानगर – कल्याण असा करण्याचे अनेक माध्यमांव्दारे निवेदनात दिसुन येत आहे. मात्र लातुर – अंबाजोगाई केज बीड–जामखेड – अहिल्यानगर – कल्याण हा मार्ग निश्चित करण्यात आलेला आहे. तो मार्ग तांत्रिक, भौगोलिक तसेच सार्वजनिक हिताच्या दृष्टीने अधिक योग्य व लाभदायक आहे. सदर मार्गामुळे बीड व अहिल्यानगर जिल्ह्यातील मोठ्या लोकसंख्येला थेट संपर्क मिळतो. वाहतुक सुलभ होते व कृषी, व्यापारी व औद्योगिक दळणवळणास चालना मिळते. त्यामुळे मार्गात बदल केल्यास अपेक्षित लाभ कमी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्व बाबीचा विचार करता मार्ग न बदलता लातुर–अंबाजोगाई–केज बीड जामखेड अहिल्यानगर – कल्याण हाच नियोजित मार्ग कायम ठेवावा अशी मागणी करण्यात आली आहे



# वृत्तपत्र वितरकांना दिला रोटरी क्लबने उबदार मदतीचा हात सामाजिक कार्यात सदैव पुढाकार

दैनिक वादळ वार्ता
**गेवराई। प्रतिनिधी**

वाढलेला थंडीचा कडाका लक्षात घेऊन रोटरी क्लब ऑफ गेवराईच्या वतीने सामाजिक भान राखत पहाटेच्या थंडीत वृत्तपत्र वितरक पेपर वाटण्याकरिता जीवाची पर्वा न करता काम करीत असतात . अशा वितरकांना व रोजंदारीवर उदरनिर्वाह करणाऱ्या , उपेक्षित गरजूंना रोटरी क्लब ऑफ गेवराईने उबदार स्वेटर्स व ब्लँकेट देऊन मायेची उब दिली आहे . रोटरी क्लब ऑफ गेवराई नेहमीच सामाजिक कार्य करीत असते . मंगळवार दि . २३ रोजी झालेल्या रोटरी क्लबच्या बैठकीत वृत्तपत्र वितरक यांना उबदार कपडे देण्याचा उपक्रम हाती घेण्याचा निर्णय घेण्यात आला आणि २४ तासाच्या आत गेवराई शहरात पहाटे थंडीमध्ये वृत्तपत्र वाटप करणाऱ्या १२ गरीब होतकरू तरुणांना उबदार स्वेटर्स देण्याचा कार्यक्रम रोटरी क्लबचे कोषाध्यक्ष सुरेश बरगे यांच्या संजय किराणा या प्रतिष्ठानावर बुधवार दि . २४ डिसेंबर २०२५ रोजी ४ वाजता अत्यंत साधेपणाने संपन्न झाला .त्याचबरोबर बस स्थानक, बँका, मोंढा विभागात फुटपाथवर हातगाड्यावर उबदार कपड्याशिवाय असणाऱ्या वृद्धांना ब्लँकेट वाटप करण्यात आले . रोटरी क्लब ऑफ गेवराईचे अध्यक्ष प्रा . राजेंद्र बरकसे, सचिव प्रविण जैन , सुरेंद्र रूकर, कोषाध्यक्ष सुरेश बरगे, जेष्ठ रो . राधाकिशन लड्डा , राजेंद्र डेंगे , गणेश कुलकर्णी, प्रा . आर . डी . मुंडे आदींच्या उपस्थितीत गरजूंना स्वेटर्स देण्यात आले . यावेळी रोटरी क्लबचे सदस्य डॉ . महेश कुलकर्णी ,जयराज कौरानी ,डॉ शाम झंवर, नितीन सिकची उपस्थित होते . यावेळी वृत्तपत्र विक्रेते विलास देशपांडे, अनिल बेदरे, सुभाष नारनवळे,वृत्तपत्र वितरण करणारे साईराम महामुनी, गणेश वाघमारे, अमोल अंभुरे ,महेश वाघमारे, मंगेश दावणगिरे, विनोद पवार, लहू पाळेकर, रोहित बेद्रे, कृष्णा ठोसर यांच्यासह प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते . रोटरी क्लबच्या या स्तुत्य कार्यक्रमाचे समाजात कौतुक होत आहे .



# पुस्तकी गणित उतरले तोरणमाळच्या बाजारात
## निवासी विद्यालयाचा 'अनुभवातून शिक्षणाचा' यशस्वी प्रयोग



दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

आजच्या धावपळीच्या आणि स्पर्धात्मक युगात केवळ गुणवत्तेवर भर न देता, विद्यार्थ्यांना जीवन जगण्याचे कौशल्य शिकवणे अधिक महत्त्वाचे झाले आहे. हाच आदर्श डोळ्यासमोर ठेवून नेताजी सुभाषचंद्र बोस निवासी विद्यालय, तोरणमाळ येथे 'अनुभवातून शिक्षण' हा अनोखा उपक्रम राबविण्यात आला. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांनी केवळ वर्गात गणित न शिकता, चक्क तोरणमाळच्या साप्ताहिक बाजारात उतरून खरेदी–विक्रीचा प्रत्यक्ष अनुभव घेत व्यावहारिक गणिताचे धडे गिरवले.मुख्याध्यापक राजाराम वळवी यांच्या कल्पक मार्गदर्शनाखाली हा उपक्रम सुट्टीच्या दिवशी आयोजित करण्यात आला होता. शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी संयुक्तपणे बाजारात जाऊन किराणा,भाजीपाला आणि इतर जीवनावश्यक वस्तूंची खरेदी–विक्री केली. यावेळी विद्यार्थ्यांनी नोटांची ओळख, पैशांची देवाण–घेवाण आणि अचूक हिशोब करणे.वस्तूंचे बाजारमूल्य समजून घेऊन नफा आणि तोटा यातील फरक अनुभवणे. ग्राहक आणि विक्रेता म्हणून एकमेकांशी बोलताना लागणारा आत्मविश्वास आणि शिष्टाचार आत्मसात करणे. केवळ पुस्तकी व्याख्या पाठ करण्यापेक्षा, प्रत्यक्ष कृतीतून शिकल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास दिसून आला. बेरीज–वजाबाकी जेव्हा बाजारातील हिशोबात येते, तेव्हा ती अधिक चांगल्या प्रकारे समजते, अशी भावना यावेळी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये निर्णयक्षमता, वेळेचे नियोजन आणि आर्थिक साक्षरतेची बीजं लहान वयातच पेरली गेली आहेत. निवासी विद्यालयाच्या या उपक्रमाचे परिसरातून मोठे कौतुक होत आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ चार भिंतींतील शिक्षण पुरेसे नाही, हे या शाळेने आपल्या कृतीतून सिद्ध केले आहे. या उपक्रमाच्या यशासाठी शाळेतील सर्व शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले असून, यशस्वी विद्यार्थ्यांचे प्रशासनाकडून अभिनंदन करण्यात येत आहे.विद्यार्थी स्वावलंबी आणि सक्षम नागरिक बनावेत, हाच आमचा उद्देश आहे. अनुभवातून मिळालेले शिक्षण विद्यार्थी आयुष्यभर विसरत नाहीत. मुख्याध्यापक राजाराम वळवी यांनी सांगितले.

# मौजे बोरफडी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत फळवृक्ष लागवड

दैनिक वादळ वार्ता
**बीड प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील मौजे बोरफडी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत फळवृक्ष लागवड उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. या उपक्रमाचा उद्देश पर्यावरण संवर्धन, हरित गाव संकल्पना तसेच ग्रामविकासाला चालना देणे हा आहे.
या कार्यक्रमाच्या वेळी बोरफडी गावाचे सरपंच श्री. कैलास घुगे यांच्या हस्ते फळवृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी सरपंच कैलास घुगे यांनी ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना आवाहन केले की मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत वृक्षसंवर्धन व पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिला.
सरपंच कैलास घुगे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, फळवृक्ष लागवड ही केवळ पर्यावरणासाठीच नव्हे तर भविष्यातील पिढीसाठीही एक महत्त्वाची गुंतवणूक आहे.



गावातील प्रत्येक नागरिकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करावे.
या उपक्रमामुळे गावात हरित क्षेत्र वाढीस लागणार असून पर्यावरण संतुलन राखण्यास मदत होणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.
यावेळी ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी, अंगणवाडी सेविका व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते

# वादळी कट्टा
## भ्रष्टाचाराचा महापूर

महाराष्ट्राची माती पवित्र, शूरांची ही भूमी,
पण भ्रष्टाचाराने व्यापली आज तिची छाती कोमल कोमल झूमी.
खुर्ची मोठी, स्वार्थ मोठे, लाच दिली की काम,
जनतेच्या आशा–स्वप्नांना लागला आहे थाम.
कागदावरच्या योजना मोठ्या, भाषणांची आतषबाजी,
जमिनीवर मात्र अर्धवट कामे, बाकी फक्त दिखाव्याची सज्जी.
रस्ते खड्ड्यात, खड्डे रस्त्यात, कोणी तरी जबाबदार?
प्रश्न विचारताच फाईल हरवते–म्हणे उद्या ये रे उद्या यार.
शेतकरी रडतो, विद्यार्थी थांबतो, रुग्णालयात रांगा,
सत्तेच्या गल्लीमध्ये मात्र पैशांचीच रंगेल तांगा.
आपणच बदल घडवायचा, हीच मनाशी घ्या शपथ,
ईमानदारीची ज्योत पेटवा–याच्यातच खरी शक्ती, खरं संपन्नत्व.
माती, माणसं, संस्कार आपल्या, अभिमानाचा हा देश,
भ्रष्टाचाराच्या सावल्या हटवू–करू नवीन सुरेख प्रदेश

# स्वातंत्र्याची ७८ वर्ष उलटूनही रस्ता नसल्याने नागरिकांचा जीवघेणा संघर्ष–तोलवापाडा आऊट ऑफ द कव्हरेज

### रस्त्यातच रुग्णांना गमवावा लागतो जीव

पिंपळखुंटाचा मोठा तोलवापाड्यातील रहिवासी वाहऱ्या जुगला वसावे वय ८० यांची अचानक ताप, सर्दी, खोकल्यामुळे तब्येत बिघडली परिणामी शरीरातील ऊर्जाच साथ देत नसल्यामुळे त्यांना चालणे मुश्किल झाले होते शिवाय त्यांना तात्काळ आरोग्यसेवेची आवश्यकता असल्यामुळे स्थानिकासह नातेवाईकांनी वाहऱ्या बाबांना तातडीने रस्त्याअभावी मुख्य रस्त्यापर्यंत खडतर पायवाटेचा आधार घेत बांबूच्या झोळीतून नेण्याची वेळ आली. तेथून त्यांना मोलगी येथील खाजगी दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आले. रक्त चाचणीअंती वाहऱ्या बाबांना डेंग्यू संक्रमण झाल्याने रक्त पेशी कमी झाल्या असल्यामुळे मोठा त्रास सहन करण्याची नामुष्की आली. परिणामी तोलवापाड्यापर्यंत वाहनच पोहचू शकत नसल्याने बऱ्याचदा रूग्णांना ॲम्बुलंन्सशिवाय बांबूलन्सचा आधार घ्यावा लागतो. कापडाची झोळी बांधून पिंपळखुटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रापर्यंत नेण्यासाठी सुमारे ४ किलोमीटरचा पल्ला गाठावा लागतो. त्यामुळे काही रुग्ण वाटेतच दगावत असल्याची सद्यस्थिती आहे. हे दाहक वास्तव अनेकांच्या मनाला चटका लावून जाणारे आहे.

“ गाव पाड्याच्या विकासाच्या दृष्टीने दळणवळणाची सुविधा उपलब्ध होणे अपेक्षित असते. परंतु आमच्या तोलवापाड्याचे दुर्दैव म्हणावे, का आजही आम्हाला आमचे जीवनमान उंचावण्यासाठी संघर्ष करावा लागतो, रस्त्याअभावी आमच्या पाड्यातील लेकरांना पाड्याच्या शेवटच्या टोकावर असलेल्या एक ते दिड किमी अंतरावरील जि. प. शाळा व अंगणवाडी केंद्रात लेकरांसाठी जाणे येणे शक्य होत नाही रस्त्याअभावी आम्हाला आरोग्यांच्या देखील अडचणी निर्माण होतात. आतातरी शासनाने लक्ष देण्याची गरज आहे.
ग्रामस्थ –रमेश चमाऱ्या वसावे (तोलवापाडा)

दैनिक वादळ वार्ता
**रविंद्र वळवी मोलगी | प्रतिनिधी**

अक्कलकुवा तालुक्यातील अतिदुर्गम भागात असलेले पिंपळखुंटाचा तोलवापाडा हे गाव दळणवळणाच्या स्वातंत्र्याच्या ७८ वर्षानंतरही सोयीं सुविधापासून दुर्लक्षित आहे. देशाने स्वातंत्र्याची अठ्यात्तरी ओलांडली असतांना देखील या पाड्याकडे शासन व प्रशासनाने डोळेझाक केल्यामुळे रस्ताच नसल्याने येथील ग्रामस्थांना नागमोडी, अरुंद आणि चढउतार असलेल्या जीवघेण्या पायवाटेचा आधार घ्यावा लागत आहे. यामुळे आता आम्हाला रस्त्यासह विविध सोयी सुविधा पूरवा अशी आर्त हाक येथील नागरिकांनी शासनासह लोकप्रतिनिधीना दिली आहे. तोलवापाडा हे गाव स्वातंत्र्योत्तर काळापासून ते आजपर्यंत पूर्णतः पायाभूत सुविधांपासून 'आऊट ऑफ द कव्हरेज' राहिलेला आहे, यात महत्त्वाचे म्हणजे पिंपळखुटा ते मोठा तोलवापाडा दरम्यान सुमारे ४ किलोमीटरचा रस्ताच न झाल्याने येथील रहिवाशांना आजही जीवघेणा संघर्ष करत मरण यातना सहन कराव्या लागत आहेत. गेल्या पाच वर्षात रस्त्या अभावी रुग्णालयात वेळेवर पोहचू न शकल्याने आता पर्यंत आठ जणांचा मृत्यू झाल्याचे ग्रामस्थ सांगतात. या गावात जाण्यासाठी जेमतेम पादचारी रस्ता आहे. मात्र त्या रस्त्यावर पायी चालणे देखील अवघड आहे. जेमतेम वरच्या मोठा तोलवापाड्याला जोडणाऱ्या रुतवाई नदीवर एक पूल नंदुरबार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशानंतर मंजूर करण्यात आला आहे. शिवाय पुलासाठी भलामोठा खड्डा खोदून ठेवण्यात आला आहे मात्र तीन



महिन्यापासून बांधकाम ठेकेदारच गायब झालेला आहे. खड्डा फक्त देखाव्यासाठी आहे. या पुलाचे प्रत्यक्ष बांधकाम होणार कधी असा संतप्त सवाल येथील ग्रामस्थ उपस्थित करीत असून संबंधित ठेकेदारावर कार्यवाहीची मागणी केली आहे.

रुतवाई नदीवर तीन महिन्यापासून फक्त खड्डा खोदून ठेवला आहे. ठेकेदार तीन महिन्यापासून बेपत्ता असून त्या खोदलेल्या खड्ड्यामुळे येथील ग्रामस्थांसह अबालवृद्ध, शाळेकरी मुले, अंगणवाडीत जाणारी लहान बालके, गरोदर तसेच स्तनदा मातांना या खड्ड्यातून वाट तुडवीत मार्ग काढतांना मोठा संघर्ष करुन मार्गक्रमण व्हावे लागते. तीन महिन्याच्या कालावधीत त्या खड्ड्यात पडून ग्रामस्थ जखमी देखील झाल्याच्या घटना घडल्या आहेत. संबधित ठेकेदाराच्या या निष्क्रिय भूमिकेमुळे येथील नागरिकांना डोंगराळ, अरुंद, नागमोडी खोल दरीतून जीवघेण्या पायवाटेचा आधार घ्यावा लागतो, शिवाय तोलवापाड्यात कोणी आजारी पडल्यास त्या रुग्णाला याच डोंगराळ, नागमोडी, अरुंद खोल दरीतून जाणाऱ्या पायवाटेने घेऊन जावे, लागते. या पायवाटेने रुग्णांना घेऊन जातांना मोठया अडचणींचा सामना करावा लागतो.

महत्वाचे म्हणजे पिंपळखुंटा ते मोठा तोलवापाडापर्यंतचा ४ किलोमीटरचा रस्ता राज्य शासनाच्या जिल्हा व ग्रामीण विकास योजनेतून (३०५४) मंजूर करण्यात आल्यानंतर त्यासाठी निधीही देण्यात आला आहे. परंतु, मंजूरी मिळून ५ वर्षे होऊनही रस्त्याचे काम सुरूच झालेले नाही. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शहादा (५०५४) मार्ग व पूल (४) जिल्हा व इतर मार्ग या योजनेंतर्गत तोलवापाडा पिंपळखुंटा काकडतीपाडा रस्ता तयार करणे या कामाचे भूमिपूजन सोहळा दि.२ डिसेंबर २०२३ रोजी माजी आमदारांच्या हस्ते संपन्न झाला होता. मात्र, त्यानंतरदेखील ठेकेदाराने कामाला सुरुवात केलेली नाही.

त्यामुळे डोंगरदऱ्यातून व घाटातून पायीच पिंपळखुटा आरोग्य केंद्रापर्यंत पोहोचण्यास उशीर झाल्याने गेल्या ५ वर्षांत गरोदर मातांसह एकूण ८ जणांचा मृत्यू झाल्याचे देखील येथील ग्रामस्थांनी सांगितलेरस्त्याअभावी येथील रहिवाशांना २ किलोमीटरचा घाट उतरुन रतवाई नदी ओलांडल्यावर पुन्हा १ किलोमीटरचा घाट चढून मुख्य रस्ता गाठावा लागतो. मोठा तोलवापाड्यातून एकुण ६० पेक्षा अधिक बालके लहान तोलवापाडा येथील जिल्हा परिषद शाळा व अंगणवाडीत याच घाटातून येतात. त्यांच्या जीवाला याच घाटात सर्वाधिक

धोका असल्यामुळे तत्काळ येथे रस्त्याचे काम करण्यात यावे, व संबंधित ठेकेदाराची चौकशी करुन कारवाई करण्याची अशी मागणी देखील करण्यात आली आहे.

पुर्वी पासून आम्ही तोलवापाड्यात वास्तव्य करीत आलो असून आमची चौथी पिढी येथे वास्तव्य करीत आहोत तरीही आम्हाला आमच्या पाड्याच्या सोयी सुविधेसाठी ना शासनाने ना लोकप्रतिनिधीने लक्ष दिले. आजही ना रस्ते ना पाणी अश्या अनेक संकटाचा सामना करत आजही आम्ही जीवन जगतोय. वीज वगळता कोणतीच सुविधा वा योजना आमच्यापर्यंत पोहचल्या नाहीत. पाण्यासाठीची आमची वणवण कायम पूजलेलीच आहे. रतवाई नदीच्या डोंगरावरील उंच भागातून डबके तयार करुन त्यातून पाईप टाकून उतरत्या भागातून पाईप वळवून आम्ही आमच्या स्वखर्चाने पाणी पोहचवून पिण्यासाठी वापर करीत असतो एवढा संघर्षमय जीवन जगत असतांना देखील कोणाला ते दृश्य दिसले नसेल तर ती शोकांतिकाच म्हणावी म्हणुन आम्ही यापुढील येणाऱ्या जि. प. व पंचायत समितीच्या निवडणूकीच्या वेळेस कोणत्याच पक्षाच्या उमेदवाराला मतदान न करण्याचा निर्णय घेतला आहे.
ग्रामस्थ– कर्मा सेदा वसावे (तोलवापाडा)

## नंदुरबार पोलिसांची मोठी कारवाई: ४० लाखांची अवैध दारू जप्त, दोन आरोपी जेरबंद

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार | दिपक गोसावी**

वैध दारू तस्करीविरुद्ध नंदुरबार स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली आहे. गुजरात राज्यात तस्करीच्या उद्देशाने नेली जाणारी तब्बल ४० लाख ३८ हजार ५६० रुपये किमतीची विदेशी दारू आणि दोन वाहने पोलिसांनी जप्त केली आहेत. या कारवाईत दोन आरोपींना अटक करण्यात आली असून अक्कलकुवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांना २४ डिसेंबर रोजी खात्रीशीर माहिती मिळाली होती की, बऱ्हाणपूर–अंकलेश्वर मार्गाने एका विना नंबरच्या टाटा ४०७ ट्रक मधून विदेशी दारूची वाहतूक होणार आहे. या ट्रकला रस्ता दाखवण्यासाठी (पायलटिंग) एक पांढऱ्या रंगाची वॅगनआर कार पुढे चालणार असल्याची माहितीही पोलिसांना मिळाली होती.



पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस. आणि अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेच्या पथकाने अंकलेश्वर–बऱ्हाणपूर रस्त्यावरील मोरांबा फाट्यावर सापळा रचला. रात्रीच्या वेळी संशयास्पद वॅगनआर कार आणि त्याच्या पाठीमागून येणारा टाटा ४०७ ट्रक दिसताच पोलिसांनी बॅटरीच्या सहाय्याने इशारा देऊन त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला. पोलिसांना पाहताच काही जणांनी अंधाराचा फायदा घेऊन पळ काढला, मात्र पथकाने दोन आरोपींना शिताफीने ताब्यात घेतले.

अटक करण्यात आलेले आरोपी:–
१. इरफान असलम खान (वय ३८, रा. सेंधवा, जि. बडवाणी, मध्यप्रदेश)
२. राकेश इंदारामजी मेघवाल (वय ३०, रा. शिरपूर, जि. धुळे.

पोलिसांनी वाहनांची झडती घेतली असता, त्यात विदेशी दारूच्या बाटल्यांचे एकूण ५८ मोठे खोके (एकूण २३२ पेट्या) आढळून आले.
दारूची किंमत: २३ लाख ३८ हजार ५६० रुपये.
वाहनांची किंमत: १७ लाख रुपये.
एकूण मुद्देमाल: ४० लाख ३८ हजार ५६० रुपये.

**या पथकाने केली कारवाई**

ही कारवाई पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, पोलीस उपनिरीक्षक मुकेश पवार, दादाभाई मासुळ, महेंद्र नगराळे, मोहन ढमढेरे, चेतन साळवे आणि शोएब शेख यांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

## तळोदा तालुक्यातील रांझणी येथे दिवसाढवळ्या घरफोडी; दीड लाखांची रोकड लंपास

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार | दिपक गोसावी**

तळोदा तालुक्यातील रांझणी गावात एका मजुरी करणाऱ्या महिलेचे घर फोडून अज्ञात चोरट्यांनी १ लाख ५० हजार रुपयांची रोकड लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी तळोदा पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून परिसरात खळबळ माजली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी अरुणाबाई राजु कुंभार (वय ५५, रा. रांझणी) या मजुरी करून आपला उदरनिर्वाह करतात. १६ डिसेंबर ते २५ डिसेंबर २०२५ दरम्यान त्या काही कामानिमित्त घराबाहेर असताना, अज्ञात चोरट्याने त्यांच्या बंद घराचा फायदा घेतला. चोरट्याने घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. घरातील लोखंडी पत्र्याच्या पेटीचे कुलूप तोडून त्यातील कापडी पिशवीत ठेवलेली १ लाख ५० हजार रुपयांची रोख रक्कम चोरून नेली.

दिनांक २५ डिसेंबर रोजी रात्री १०:३५ वाजेच्या सुमारास अरुणाबाई कुंभार यांनी तळोदा पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ३०५ (अ), ३३१ (४), (२) अन्वये घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.

पोलीस निरीक्षक राजन मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अकिलखान पठाण या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. गावातील संशयास्पद हालचाली आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरट्याचा शोध घेण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. कष्टकरी महिलेची मोठी रक्कम चोरीला गेल्याने गावात हळहळ व्यक्त होत आहे.

# ‘राजा प्रसेनजित पब्लिक स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज ही विद्यार्थ्यांच्या बौद्धिकतेसह कला–गुणांचा विकास करणारी आदर्श शाळा!’–सिनेअभिनेते अरुण कदम यांचे गौरवोद्गार

## सिनेअभिनेते अरुण कदम आणि कामेडियन सनी–बनी यांच्या उपस्थितीत आठवा प्रज्ञायन महोत्सव जल्लोषात साजरा

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

प्राचीन भारतीय संस्कृतीतील नालंदा विद्यापीठाचा वारसा आपल्या शैक्षणिक मूल्यातून अधोरेखित करणारी तसेच लातूर पॅटर्न राबवून स्वतंत्र ओळख निर्माण करणारी एक आदर्श शाळा म्हणून या शाळेचे आगळे–वेगळे स्थान कायम टिकून आहे. या शाळेत बौद्धिक विकास तर प्राधान्याने केला जातोच सोबत विद्यार्थ्यातील सुप्त कला–गुणांना जाणून घेवून त्यांचा शारीरिक, मानसिक व सांस्कृतिक विकास करण्यावरही भर दिला जातो. या शाळेतील विद्यार्थी भवितव्यात विकसित भारत निर्माण करणारे विद्यार्थी घडवले जातात, या शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे भवितव्य उज्वल आहे, याची मला खात्री आहे. असे प्रशंसोद्गार सिनेअभिनेते अरुण कदम यांनी दिनांक १८ डिसेंबर २०२५ रोजी संपन्न झालेल्या आठव्या प्रज्ञायन महोत्सवाच्या सोहळ्यात या सोहळ्यात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करताना काढले. राजा प्रसेनजित पब्लिक स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजचा आठवा प्रज्ञायन महोत्सव अर्थात वार्षिक स्नेहसमेलन सोहळ्यात अनेक दिग्गज मान्यवरांनी उपस्थिती दाखविली. विद्यार्थी हा शिक्षणातील प्राविण्याबरोबर समाजोन्मुख असला पाहिजे, विद्यार्थी हा समाजातील विवेकमूल्य जपणारा केंद्रभिमुख असला पाहिजे आणि ते या शाळेतून निश्चित प्राप्त होत आहे याचा मला मनस्वी आनंद आहे. असे उद्गार प्राचार्या पुजा कांबळे यांनी अहवाल सादर करताना शाळेची भूमिका व वाटचाल स्पष्ट केली.या महोत्सवात विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचा अविष्कार करताना आपल्या संस्कृतीची मूल्य जपणारे प्रदर्शन घडविले, जागतिकीकरणाच्या प्रवाहात आपले अस्तित्व टिकले पाहिजे, सोशल मीडियाचा योग्य वापर झाला पाहिजे, शेतकरी हा आपणा सर्वांचा अन्नदाता असून त्याच्याप्रती कृत्यर्थ असले पाहिजे, सैनिकाप्रती गर्व, लोकशाहीप्रती निष्ठा, संविधानाप्रती आदर, महापुरुषांचे विचार अनुसरण या प्रमुख भूमिका या सोहळ्यातून प्रतीत झालेल्या पहायला मिळाल्या. या सोहळ्यात विविध क्षेत्रातील मान्यवरांचा ‘प्रज्ञायन’ पुरस्कार प्रदान केला जातो यावर्षी मा. प्राचार्य दिलीप गायकवाड यांना पेरियार रामास्वामी सामाजिक एकात्मता, सिनेअभिनेते मा. अरुण आनंदा कदम यांना डॉ. अण्णा भाऊ साठे कलारत्न, मा. विजयकुमार अभिमान कांबळे यांना संविधान गौरव, मा. मा. सचिन विश्वनाथ बनसोडे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता, मा. दीक्षा दिलीप जाधव यांना उलगुलान मुकनायिका, मा. डॉ. प्रज्ञा जी. डोंगरगावकर–भालधरे यांना जीवक कौमारभच्च, मा.प्राचार्य हरिदास भोजुराम राठोड यांना प्राचार्य डॉ. ना. य. डोळे पुरस्काराने हास्यजत्रा फेम सिने अभिनेते अरुण कदम यांच्या हस्ते प्रज्ञायन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

वर्षभरातील नैपुण्य प्राप्त गुणवंत विद्यार्थी आद्वीक विशाल साळोखे, सान्वी गणेश घरत,




हृदयी भाई म्हात्रे, प्रांजल प्रशांत येवले, झेद जावेद सय्यद, प्रणीत सुधाकर करंगुळीकर, आत्मजा ज्ञानेश्वर सूर्यवंशी, अवंतिका शिवाजी कदम, आकृती कृपा शंकर पाल, शिवांगी भारती कमलेश, अंश संतोष यादव अथर्व धनाजी म्हात्रे, प्रिन्स किरण वानखेडे या गुणवंत विद्यार्थ्यांचा ‘स्टुडंट ऑफ दी इयर’ पुरस्काराने तर स्मित किरण वानखेडे याचा बाल अभिनय पुरस्काराने सिनेअभिनेते मा. अरुण कदम यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या जल्लोषपूर्ण सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून विधिज्ञ मा.सुशील महाडीक, मा. नीलेश गडकर, मा. व्ही.के. उपाध्याय, मा. लक्ष्य सरण, मा. रूपस कलकत्ते, मा. कमलाकर कांबळे, विधिज्ञ राजेश मोतेवाड, प्राचार्य डॉ. राहुल डोंगरगावकर, मा.अंतेश गवळी, विधिज्ञ विठ्ठल गडीकर, विधिज्ञ विजयकुमार कांबळे, विधिज्ञ बबन सूर्यवंशी, मा. अक्षयकुमार कांबळे, मा. नारायण करडे, मा. अनिल मुळे, प्रा. पद्माकर कांबळे, विधिज्ञ मा. रविकुमार करडे, विधिज्ञ मा. अमोल कांबळे, मा. अंतेश गवळी, मा. निकिता डोंगरगावकर, मा. हरिश्चंद्र पाटील, मा. तानाजी मढवी, मा. राजू अमृतवार, मा. राम कांबळे, मा. सुनील बोयेवार, मा. अशोक कांबळे, मा. लतीफ शेख, मा. अविनाश मोरे, मा. छबाबाई गायकवाड, मा. बालाजी करडे, मा. सचिन तांबे, मा. अर्जुन वाघमारे, मा. बालाजी वाघमारे, आदी मान्यवर उपस्थित होते. या सोहळ्याचे उद्घाटन संस्थेचे संचालक मा. केराबाई शेषराव करडे, सचिव मा. संविधा करडे यांच्या हस्ते झाले. यावेळी संस्थेचे संचालक मा. दिलीप कांबळे, मा. सुरेश करडे, मा. विलास करडे, मा. सुरेश करडे, मा. विवेक करडे, मा. अनीता करडे, मा. प्रमिला करडे यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले.हा सोहळा यशस्वी करण्यासाठी प्राचार्या पुजा कांबळे, प्रांजली पवार, शिलाताई कांबळे, स्नेहल काळोखे, मनीषा फाकडे, उपप्राचार्या लता वानखेडे, उपप्राचार्या सपना मळेकर, नीलम जगताप, रत्नदीप कांबळे, बबली राजपूत, रुबी सयद, शारदा सिंग, मंजुळा कदम, पूनम पवार, ऐश्वर्या कापसे, प्रणाली शिंदे, पूजा निंबाळकर यांच्यासह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या समारोपानांतर संस्थेच्या सचिव संविधा करडे यांनी सर्वांचे आभार मानले. आयोजक प्रा. रमेश करडे यांनी या सोहळ्याचे सुंदर आयोजन केले. या सोहळ्यासाठी आजूबाजूच्या पंचक्रोशीतून अनेक पालकांनी गर्दी केल्याचे दिसून आले.

# केज प्रशासन आपण वाट बघताय का उपोषणार्थीच्या मरणाची?

## उपोषणाचा निर्णय लावला नाही तर उद्रेक होण्याची शक्यता?;उपोषणाचा ११/१२ वादिवस



दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

चिंचोली माळी ता.केज येथे विविध प्रलंबित नागरी व शासकीय मागण्यांच्या पूर्ततेसाठी रोहन गलांडे यांनी बेमुदत आमरण उपोषणास सुरुवात केली आहे. बुधवार दि.१७ डिसेंबर रोजी सायंकाळी ७-३० वाजता संत नामदेव महाराज मंदिर येथे ते उपोषणास बसले आहेत.काही मागण्या मान्य झाल्या आहेत परंतु एक दोन मागणीसाठी रोहन गलांडे पाटील यांना जिवे मारायच ठरवले आहे असे चिन्ह दिसत आहेत कारण अमरण उपोषणाचा ११ वा दिवस आहे रोहन गलांडे पाटील यांची प्रकृती चिंताजनक झाली आहे व रोहन गलांडे यांनी जनतेला शेवटचा रामराम घ्यावा असे म्हटले आहे.कारण त्यांना बोलताना छातीवर दाब येत आहे,डोके दुखी उम्मघाम होत आहे,छातीत दुखायला सुरुवात झाली आहे,अंग थरथरत आहे एवढ्या वेदना होतात परंतु प्रशासनाला काही घेणे देणे नाही परंतु रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे की मेलो तरी चालेल पण मागण्या मान्य झाल्या शिवाय अमरण उपोषण मागे घेणार नाही.या विषयी सविस्तर वृत्त असे की चिंचोली माळी येथील उर्वरित अतिक्रमण तात्काळ हटवून छत्रपती संभाजी महाराज चौक (नागबेट वस्ती) ते संत नामदेव महाराज मंदिरा पर्यंत रस्ता व नालीचे काम त्वरित सुरू करण्यात यावे,अशी प्रमुख मागणी त्यांनी केली आहे. मागणीही उपोषणातून करण्यात आली आहे.यासोबतच चिंचोली माळी ग्रामपंचायत हद्दीतील नामदेव महाराज परीसरातील अतिक्रमण हटविण्यासाठी आता नऊ दिवस झाले अमरण उपोषणाला बसले आहेत.दि.११ डिसेंबर २०२५ रोजी तहसीलदार यांना निवेदनाद्वारे सादर केलेल्या सर्व मागण्या मान्य करण्यात याव्यात मागण्यांसाठीच हे आमरण उपोषण सुरू करण्यात आल्याचे रोहन गलांडे यांनी सांगितले आहे.मागण्या मान्य होई पर्यंत उपोषण सुरूच राहील,असा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

# तळोद्यात ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांना रेडियम रिफ्लेक्टर; प्रवासी महासंघाचा स्तुत्य उपक्रम



**प्रवासी महासंघातर्फे राबवलेला हा उपक्रम अत्यंत कौतुकास्पद आहे. यामुळे रात्रीच्या वेळी घडणाऱ्या दुर्दैवी अपघातांना आळा बसेल.**
**– राजन मोरे (पोलीस निरीक्षक, तळोदा).**

**ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांनी रिफ्लेक्टर लावले, तर इतरांना ती अंधारात स्पष्ट दिसतील. रस्ते सुरक्षा ही आपली सर्वांची जबाबदारी आहे.**
**– अल्पेश जैन (अध्यक्ष, प्रवासी महासंघ, तळोदा)**



दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे रात्रीच्या वेळी होणाऱ्या अपघातांचे सत्र रोखण्यासाठी 'महाराष्ट्र प्रदेश प्रवासी महासंघ' तळोदा तालुका शाखेच्या वतीने एक महत्त्वाचा सामाजिक उपक्रम राबवण्यात आला. परिसरातील केदारेश्वर आणि श्रीकृष्ण खांडसरी साखर कारखान्यांतर्गत ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर, बैलगाड्या व इतर वाहनांना रेडियम रिफ्लेक्टर लावण्यात आले.

हिवाळ्याच्या दिवसांत ऊस तोडणी हंगाम जोरात सुरू असतो. रात्रीच्या वेळी ऊस भरलेली वाहने रस्त्याच्या कडेला उभी असताना किंवा चालत असताना समोरून येणाऱ्या वाहनचालकांना त्यांचा अंदाज येत नाही. यामुळे अनेकदा भीषण अपघात घडतात. ही बाब लक्षात घेऊन प्रवासी महासंघाने हा उपक्रम हाती घेतला. शहादा आणि अक्कलकुवा रोडवर दोन्ही कारखान्यांच्या परिसरात ही मोहीम राबवण्यात आली. तळोदा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजन मोरे यांच्या हस्ते या उपक्रमाचा प्रारंभ झाला. यावेळी त्यांनी स्वतः काही वाहनांना रिफ्लेक्टर लावले आणि वाहनचालकांशी संवाद साधून सुरक्षिततेबाबत प्रबोधन केले. रेडियम रिफ्लेक्टरमुळे लांबूनच वाहन चमकून दिसेल, ज्यामुळे मागील वाहनचालक सावध होतील आणि संभाव्य दुर्घटना टळतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या प्रसंगी ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. संजय शर्मा, प्रवासी महासंघाचे तालुकाध्यक्ष ड. अल्पेश जैन, सचिव प्रा. राजाराम राणे, प्रा. रमेश मगरे, जिल्हा सचिव अशोक सूर्यवंशी, रमेश कुमार भाट, पंडित भामरे, चेतन शर्मा, कुशल जैन, उल्हास मगरे, अक्रम पिंजारी, चेतन धानका यांच्यासह पोलीस वाहतूक शाखेचे कर्मचारी पोलीस कॉन्स्टेबल संदीप महाले आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रवासी महासंघाच्या या सेवाभावी कार्याचे संपूर्ण तालुक्यातून कौतुक होत आहे.

## उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांविरोधात पंचायत समितीत खुर्चीला हार

# वंचित बहुजन आघाडी आक्रमक;उशिरा येणे,गैरहजेरी आणि सही करून पलायन



दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज पंचायत समिती कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या अनियमित उपस्थितीविरोधात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. यावेळी गटविकास अधिकारी यांना निवेदन देण्यात आले असून, कार्यालयातील गैरशिस्तीचा निषेध म्हणून अधिकाऱ्याच्या खुर्चीला हार घालून लक्षवेधी आंदोलन करण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, पंचायत समितीतील विविध विभागांमध्ये कार्यरत असलेले अनेक कर्मचारी नियमित वेळेत कार्यालयात उपस्थित राहत नाहीत. काही कर्मचारी सातत्याने उशिरा येतात, तर काही पूर्णतः गैरहजर राहत असल्याचे प्रकार घडत आहेत. तसेच काही कर्मचारी फक्त एकदाच येऊन हजेरी रजिस्टरवर सही करून उपस्थिती दाखवून पुन्हा कार्यालयातून निघून जात असल्याचेही निदर्शनास आले आहे.

या प्रकारामुळे पंचायत समितीअंतर्गत येणाऱ्या सामान्य नागरिकांची कामे वेळेवर होत नाहीत. नागरिकांना वारंवार कार्यालयात फेऱ्या माराव्या लागत असून त्यांना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. शासकीय कार्यालयातील शिस्त, वेळेचे पालन व जबाबदारी यावर याचा गंभीर परिणाम होत असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

या अनियमिततेकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी यावेळी अधिकाऱ्याच्या खुर्चीला हार घालून निषेध नोंदवण्यात आला. पंचायत समिती कार्यालयातील सर्व विभागांमध्ये बायोमेट्रिक हजेरी प्रणाली सक्तीने लागू करावी, बायोमेट्रिकशिवाय कोणतीही उपस्थिती ग्राह्य धरू नये, वेळेचे पालन न करणाऱ्या व गैरहजर कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करावी, तसेच गटविकास अधिकारी यांचे ड्युटी शेड्युल कार्यालयाबाहेर वारानुसार प्रदर्शित करावे, अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली.दरम्यान, सदर मागण्यांची तात्काळ अंमलबजावणी न झाल्यास वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

# जीवाचीवाडी येथील ग्रामसभा घेऊन व्हिडिओ चित्रीकरणाची सुभाष सारुक यांची मागणी



दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

ग्रामपंचायत जिवाचीवाडी, ता केज येथे विहिरीच्या योग्य लाभार्थ्यांची निवड व पंधरावा वित्त आयोगांतर्गत होणाऱ्या खर्चास ग्रामसभेची मान्यता घेण्याबाबत गटविकास अधिकारी, पंचायत समिती केज यांनी स्पष्ट आदेश दिले आहेत.

याबाबत सुभाष सखाराम सारूक यांनी दिनांक १२ डिसेंबर २०२५ रोजी अर्ज सादर केला होता. त्या अर्जाच्या अनुषंगाने गटविकास अधिकारी वर्ग-१ यांनी सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी, जिवाचीवाडी यांना पत्राद्वारे सूचना केल्या आहेत. आदेशानुसार, गटविकास अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत तसेच पोलीस प्रशासनाच्या तैनातीमध्ये ग्रामसभा घेण्यात यावी. सदर ग्रामसभेचे व्हिडिओ चित्रीकरण करून विहिरीच्या योग्य लाभार्थ्यांची निवड करावी. तसेच पंधरावा वित्त आयोगांतर्गत होणाऱ्या खर्चास ग्रामसभेमध्ये अधिकृत मान्यता घेऊनच पुढील खर्चाची कार्यवाही करावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे.ग्रामसभेमध्ये करण्यात आलेल्या सर्व कार्यवाहीची माहिती अर्जदारास ग्रामपंचायत स्तरावरून देण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल पंचायत समिती, केज येथे सादर करण्याचेही आदेश देण्यात आले आहेत. दरम्यान, संदर्भीय अर्जाची छायांकित प्रत ग्रामपंचायतीस देण्यात आली असून, या निर्णयामुळे ग्रामपातळीवर पारदर्शकता येणार असल्याची अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# बीडमध्ये स्त्री मुक्ती दिन साजरा;रुक्मिणी नागापुरे यांच्या उपस्थितीत मनुस्मृतीचे दहन



दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

भारतीय स्त्रीला गुलामगिरीच्या साखळदंडातून मुक्त करणारा ऐतिहासिक दिवस म्हणून ओळखला जाणारा 'स्त्री मुक्ती दिन' बीड शहरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या रुक्मिणी नागापुरे यांच्या उपस्थितीत मनुस्मृती दहन करून महिलांनी आपल्या हक्कांचा जागर केला.

मनुस्मृतीचे दहन आणि निषेध कार्यक्रमाच्या सुरुवातीला बीड शहरातील मुख्य भागात महिला एकत्र जमल्या होत्या. यावेळी मनुस्मृती या ग्रंथाने स्त्री स्वातंत्र्यावर लादलेली बंधने आणि विषमतेचा निषेध करण्यात आला. 'स्त्री मुक्तीचा विजय असो' अशा घोषणा देत प्रतिकात्मक मनुस्मृतीचे दहन करण्यात आले.आणि स्त्री मुक्तीचे महत्त्व यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना रुक्मिणी नागापुरे म्हणाल्या की, स्त्रियांना शिक्षणाचा आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून देण्यात महापुरुषांचे मोठे योगदान आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृतीचे दहन करून विषमतेच्या भिंती पाडल्या आणि स्त्रियांना कायद्याने समान अधिकार दिले. आजच्या काळात महिलांनी या क्रांतीचे महत्त्व आणि विचारांची प्रेरणा समजून घेणे काळाची गरज आहे. महिलांची मोठी उपस्थिती या कार्यक्रमाला त्रिमुखे सुलोचना, रुक्मिणी नागापुरे, सुनंदा ढवळे, हौसाबाई कणसे, शोभा ढवळे, ठकूबाई ढवळे, सुनीता ढवळे, छाया फुलझळके, अलका फुल झळके व बीड परिसरातील महिलांची लक्षणीय उपस्थिती होती. गृहिणींपासून ते सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांपर्यंत सर्वच स्तरांतील महिलांनी या उपक्रमात सहभाग नोंदवला. मनुस्मृती दहनानंतर महिलांनी शिक्षण आणि स्वावलंबनाची शपथ घेतली.

या कार्यक्रमामुळे शहरात स्त्री मुक्तीच्या विचारांचा जागर झाला असून, रुक्मिणी नागापुरे यांच्या पुढाकाराचे सर्वत्र कौतुक होत आहे

# संविधानाच्या रक्षणासाठी पत्रकारांनी आपली लेखणी चालवावी–मिलिंद घाडगे

## वंचित बहुजन आघाडीच्या वतीने पत्रकार संघाच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार संपन्न



दैनिक वादळ वार्ता
**परळी । प्रतिनिधी**

भारतीय संविधानाच्या रक्षणासाठी परळी तालुक्यातील पत्रकारांनी आपली लेखणी समर्थपणे चालवावी असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे यांनी केले.परळी शहर व तालुका पत्रकार संघाच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे यांच्या निवासस्थानी नुकताच सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते.

पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष रानबा गायकवाड, तालुका कार्याध्यक्ष नितीन ढाकणे, शहराध्यक्ष शेख मुकरम व सल्लागार भगवान साकसमुद्रे यांचा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने भारतीय संविधानाची प्रत,शाल व पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.यावेळी बोलताना वंचितचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे म्हणाले की, लोकशाहीत पत्रकारांचे स्थान अतिशय महत्वाचे आहे.लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी तसेच संविधानाच्या रक्षणासाठी पत्रकारांनी आपली लेखणी चालवावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

याप्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख बालासाहेब जगतकरच, ड. सुरज घाडगे, तालुका अध्यक्ष गौतम साळवे, तालुका युवा अध्यक्ष राजेश सरवदे, माजी नगरसेवक केशव गायकवाड, तालुका युवा महासचिव ज्ञानेश्वर गीते, युवा नेते शेख शाकीर, गोविंद गीते आधी पदाधिकारी उपस्थित होते.

# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) कामगार आघाडीच्या नांदेड जिल्हाध्यक्षपदी संजय भालेराव यांची नियुक्ती



दैनिक वादळ वार्ता
**लोहा राजकुमार पिल्लोळे!**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) कामगार आघाडीच्या नांदेड जिल्हाध्यक्षपदी हारसद नगरीचे पोलिस पाटील तथा विद्यमान उपसरपंच संजय भालेराव यांची अधिकृत नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष कामगार आघाडीचे मा. उत्तमराव व्हावळे यांच्या हस्ते करण्यात आली.

या नियुक्तीप्रसंगी मा. उत्तमराव व्हावळे यांनी संजय भालेराव यांचे अभिनंदन करत त्यांना शुभेच्छा दिल्या. पक्षाने आपल्यावर सोपवलेली जबाबदारी आपण निष्ठेने, प्रामाणिकपणे आणि प्रभावीपणे पार पाडाल, तसेच कामगारांच्या प्रश्नांना न्याय देत पक्ष संघटन अधिक मजबूत कराल, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) कामगार आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. नामदार डॉ. रामदास आठवले साहेब (केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री, भारत सरकार) यांच्या सक्षम आणि दूरदर्शी नेतृत्वाखाली संजय भालेराव आपल्या नव्या भूमिकेत उत्कृष्ट कार्य करून पक्षाची ताकद तळागाळापर्यंत पोहोचवतील, असा विश्वास नियुक्तीपत्रात व्यक्त करण्यात आला आहे.संजय भालेराव यांच्या सामाजिक, प्रशासकीय व संघटनात्मक अनुभवाचा पक्षवाढीस निश्चितच फायदा होईल, असा विश्वास पक्षाच्या वतीने व्यक्त करण्यात आला असून त्यांच्या निवडीमुळे नांदेड जिल्ह्यात कामगार आघाडीला नवे बळ मिळणार आहे.

# तुलसी समूहाच्या दिनदर्शिकेचे प्रसिद्ध अभिनेते गगन मलिक यांच्या हस्ते अनावरण



दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

बुद्धभूमिकेसाठी जागतिक स्तरावर ओळख निर्माण करणारे प्रसिद्ध अभिनेते गगन मलिक यांच्या शुभहस्ते तुलसी शैक्षणिक समूहाच्या दिनदर्शिकेचे अनावरण रविवार, दिनांक २५ रोजी करण्यात आले. तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथे आयोजित कार्यक्रमात गगन मलिक यांनी तुलसी शैक्षणिक समूहाच्या शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्याची प्रशंसा करत संस्थेच्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे, प्रो.डॉ.मनोहर शिरसाट, आयु.दीपा रोडे, इंजि. दीपंकर रोडे तसेच समूहाचे पदाधिकारी, प्राध्यापकवर्ग व कर्मचारी उपस्थित होते.गगन मलिक हे भारतीय अभिनेते तसेच बौद्ध धर्माचे प्रचारक असून त्यांनी सन २०१३ मध्ये सिंहली भाषेतील 'श्री सिद्धार्थ गौतम' या चित्रपटातून आंतरराष्ट्रीय चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. या चित्रपटातील राजकुमार सिद्धार्थ यांच्या भूमिकेसाठी त्यांना संयुक्त राष्ट्रांच्या वतीने आयोजित जागतिक बौद्ध चित्रपट महोत्सवात सर्वोत्कृष्ट अभिनेता पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

या चित्रपटाला दिल्ली आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासह विविध आंतरराष्ट्रीय महोत्सवांत पुरस्कार मिळाले असून श्रीलंकेत त्याने बॉक्स ऑफिसवर विक्रमी यश संपादन केले आहे. गगन मलिक यांच्या हस्ते दिनदर्शिकेचे अनावरण होणे ही तुलसी शैक्षणिक समूहासाठी गौरवास्पद बाब असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# होळ सर्कलमध्ये विहीर खोदकामाचा शुभारंभ; जनकल्याणाच्या कामांना वेग

## जलसंवर्धन आणि शेती विकासाला नवे बळ : डॉ. अंजलीताई घाडगे







दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

बनसारोळा येथे महाराष्ट्र रोजगार हमी योजनेअंतर्गत वयक्तिक विहीर खोदकामाच्या कामाचा शुभारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. केज पंचायत समितीचे माजी उपसभापती ऋषिकेश भैय्या आडसकर, सामाजिक कार्यकर्त्या डॉ. अंजलीताई घाडगे, गटविकास अधिकारी श्री. नागरगोजे तसेच खंडूभाऊ गोरे यांच्या शुभहस्ते या कामाचा शुभारंभ करण्यात आला.या प्रसंगी श्री. जनक शहाजी गोरे यांच्या विहिरीच्या खोदकामाचा प्रातिनिधिक शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमास सरपंच अजित गोरे, उपसरपंच चंदरआबा धायगुडे, तसेच अजय काळे, गजानन गोरे, सतीश गोरे, राहुल गोरे, नितीन गोरे, राजाभाऊ धायगुडे, महेंद्र गायकवाड यांच्यासह शेतकरी बांधव आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विहीर खोदकामामुळे शेतकऱ्यांच्या सिंचन समस्येला दिलासा मिळून शेती उत्पादनात वाढ होईल. जलसंवर्धन, शेती विकास आणि ग्रामीण भागातील आर्थिक सक्षमीकरणासाठी हे पाऊल महत्त्वाचे असल्याचे मत डॉ. अंजलीताई घाडगे यांनी व्यक्त केले.

दरम्यान, पळसखेडा येथील श्री. मारुती गायकवाड यांचे सुपुत्र चि. प्रवीण यांच्या निधनाबद्दल उपस्थित मान्यवरांनी गायकवाड कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले व दुःखात सहभागी होत कुटुंबीयांना धीर दिला.



# बोरफडी येथे अनिमिया मुक्त गाव उपक्रमाचा शुभारंभ

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील मौजे बोरफडी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत अनिमिया मुक्तगाव या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा शुभारंभ गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. या उपक्रमाचे आयोजन सरपंच कैलास घुगे यांच्या वतीने करण्यात आले.

यावेळी डॉ.सय्यद यांनी अनिमिया (रक्त क्षय) आजाराबाबत मार्गदर्शन करताना महिलांमध्ये, बालकांमध्ये व किशोर वयीन मुलींमध्ये या आजाराचे प्रमाण वाढत असल्याचे नमूद केले. योग्य आहार,नियमित हिमोग्लोबिन तपासणी व आयर्नयुक्त औषधोपचार केल्यास अनिमिया प्रभावीपणे नियंत्रणात आणता येतो,असे त्यांनी सांगितले.

गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप यांनी




आरोग्यदृष्ट्या सक्षम गाव निर्मितीसाठीग्रामपंचायत, आरोग्य विभाग,आशा स्वयंसेविका वअंगणवाडी सेविका यांनी समन्वयाने काम करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले.सर्व ग्रामस्थांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा,असे आवाहनही त्यांनी केले. सरपंच कैलास घुगे यांनी गावातील सर्व घटकांची तपासणी करूनआवश्यक त्या उपचारांसह पोषण विषयक जनजागृती उपक्रम सातत्याने राबवून बोरफडी गाव अनिमिया मुक्त करण्याचा संकल्प व्यक्त केला.या शिबिरात गावातील महिलांची व किशोरवयीन मुलींची आरोग्य तपासणी व हिमोग्लोबीन तपासणी करण्यात आली व औषध उपचार केले.कार्यक्रमास विस्तार अधिकारी पारटकर सर,चांगन सर, युवाउद्योजक सुनील कुटे, ग्रामपंचायत सदस्य, आरोग्य कर्मचारी,आशा स्वयंसेविका,अंगणवाडी सेविका,ग्रामपंचायत अधिकारी गिते तसेच शालेय विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कवी राजाराम कांबळे सर यांची आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिवल पुणे येथे ५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या काव्यसंमेलन अध्यक्षपदी व काव्य सादरीकरणासाठी निवड

दैनिक वादळ वार्ता
**पुणे । प्रतिनिधी**

पुणे येथील एस.एम. जोशी सभागृहात दिनांक २ ते ५ जानेवारी २०२६ या कालावधीत संपन्न होणाऱ्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिवल या काव्य महोत्सवात भव्य विचार मंचावर स्वरचित काव्य सादरीकरणासाठी एस.के.पंतवालावलकर माध्यमिक विद्यालय कुर्ला मुंबई येथे सहाय्यक शिक्षक म्हणून कार्यरत असलेले आयु.राजाराम भीमराव कांबळे सर यांची निवड झाली असून ते मूळचे कोल्हापूर जिल्ह्या तील गारगोटी गावचे रहिवासी आहेत.अनेक सामाजिक सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये ते सक्रिय सहभागी होत असतात. अनेक काव्यसंग्रहामध्ये त्यानी काव्य लेखन केलेले असून काव्य संमेलनामध्ये सुद्धा ते सक्रिय असतात.त्यांच्या या कार्याबद्दल अनेक वेळा त्यांना सन्मानित केले गेले आहे. आंतरराष्ट्रीय



फुले फेस्टिवल या काव्य महोत्सवाची सुरुवात फुले प्रेमी संविधानदूत विजय वडवेराव सर यांनी केली आहे.हा काव्य महोत्सव निशुल्क असून महा मानवांच्या विचारांचा प्रचार प्रसाराचे कार्य वडवेराव सर करीत आहेत.या महोत्सवात कवी राजाराम कांबळे सर हे काव्य सादरीकरण करण्याबरोबरच विचार मंचावर अध्यक्षपद भूषविणार आहेत.विजय वडवेराव सर यांनी तसे त्यांना निवडीचे पत्र ही दिले आहे.या निवडीबद्दल कवी राजाराम कांबळे सर यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# मल्टी कमोडिटी एक्सचेंज एम.सी.एक्स मार्फत शासकीय आय.टी.आय.कॉलेज बार्शी येथे स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रम कार्यक्रम संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**बार्शी । प्रतिनिधी**

शासकीय आय.टी. आय.कॉलेज बार्शी येथे भारत सरकारच्या भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड अर्थात (सेबी) तसेच एम.सी. एक्सच्या माध्यमातून आय. टी.आयच्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य श्री. प्रदीप हरिदास सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून(सेबी) तसेच एम.सी.एक्स चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर श्री.गणेश चौधरी सर यांनी उपस्थितविद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले.यात त्यांनी विद्यार्थ्यांना फायनान्शियल मार्केट्स, कमोडिटीचे प्रकार, जागतिक स्तरावर सक्रिय असलेल्या कमोडिटीज, वेअर हाऊसिंग डेव्हलपमेंट रेग्युलेशन क्ट,कमोडिटी व इक्विटी मध्ये




असेल असलेला फरक,डिमॅट अकाउंट,तसेच सेबीच्या सारथी पचे महत्व या बाबतीत मार्गदर्शन केले. तसेच गुंतवणूक करत असताना विद्यार्थ्यांनी काय काळजी घ्यावी व फसवणूक करणाऱ्या योजनांपासून सावध राहण्याच्या सूचना दिल्या. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी उप प्राचार्य श्री.युवराज माढेकर सर यांनी प्रयत्न केले तसेच याकार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आडस येथे आर्थिक साक्षरता मेळावा संपन्न

## महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा आडसचे व्यवस्थापक वाघमारे सर यांची उपस्थिती

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

भारत सरकारच्या पुढाकाराने व रिझर्व **बँकेच्या प्रेरणेने व बँ**क ऑफ महाराष्ट्र च्या सहकार्याने,आणि मनी वाईज वित्तीय साक्षरता केंद्राच्या माध्यमातून आडस येथे आर्थिक साक्षरता मेळावा घेण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक उमेद च्या बचत गट सि आर पी लताताई रोडगे मॅडम यांनी केले तर रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आणि भारत सरकारच्या विविध योजनांची माहिती मनि वाईज वित्तीय साक्षरता केंद्र वडवणीचे व्यवस्थापक अश्विनीकुमार डावरे यांनी रिझर्व बँक ऑफ इंडिया च्या बँकिंग क्षेत्रातील विविध योजना उपस्थित त्यांना समजून सांगण्यात




आल्या.बँकेत जन धन खाते उघडणे,प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना,अटल पेन्शन योजना,नॅशनल पेन्शन सिस्टीम, प्रधानमंत्री श्रम योगी मानधन पेन्शन योजना, सुकन्या समृद्धी योजना, प्रधानमंत्री सुर्य घर योजना,प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योगयोजना, मुद्रा योजना यांसह बँकिंग क्षेत्रातील विविध योजना गावातील उपस्थितांना समजून सांगितल्या. महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा आडस चे व्यवस्थापक वाघमारे सर यांनी डिजीटल व्यवहार आणि सायबर फ्राड,बँक लोकपाल,बचत आणि गुंतवणूक याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मनिवाईज वित्तीय साक्षरता केंद्र केजतालुका फिल्ड कॉर्डिनेटर शितल वड्डे मॅडम यांनी केले. यावेळी गावातीलप्रतिष्ठित नागरिक बचत गटातील महिलां व आडस गावचे बहुसंख्येने नागरिक उपस्थित होते.हाकार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बचतगट सि आर पी ताई, बचत गट अध्यक्षा आणि मनी वाईज वित्तीय केंद्र केज तालुका क्षेत्र समन्वयक शितल वड्डे मॅडम यांनी परीश्रम घेतले तर यावेळी प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना,अटलपेन्शन योजना आणि सुकन्या समृद्धी योजना चे ऑफ लाईन अर्ज भरून घेण्यात आले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077